### विमुक्त जाती सेवा समिती संचलित....

# ग्रामीण (कला वाणिज्य एवं विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर, ता. मुखेड जि. नांदेड

## हिंदी विभाग द्वारा आयोजित

## राष्ट्रीय ई- संगोष्ठी

# हिन्दी संत साहित्य की प्रासंगिकता

## दिनांक :- 27/02/2021



विमुक्त जाति सेवा समिति वसंतनगर संचलित......

*ग्रामीण(कला,वाणिज्य एवं विज्ञान)महाविद्यालय वसंतनगर ता.मुखेड जि. नांदेड.*

एक दिवसीय राष्ट्रीय ई- वेबीनार

" *हिंदी संत साहित्य की प्रासंगिकता"*

शनिवार दिनांक २७/०२/२०२१ दोपहर १२: ०० बजे आयोजित किया गया है। आप सादर आमंत्रित हैं।

*अध्यक्ष*: *प्रोफे.डॉ.हरिदास राठोड* (प्रधानाचार्य,ग्रामीण महाविद्यालय वसंतनगर)

*उद्घाटक* : *डॉ.जोगेंद्र सिंह बिसेन*

(सम कुलपति, स्वा.रा.ती.म.विश्वविद्यालय, नांदेड़)

*बिजभाषक* : *डॉ.महेंद्र ठाकुरदास*

(भूतपूर्व प्रधानाचार्य,किल्ले धारूर जि. बीड)

*१-वक्ता:* *प्रोफे.डॉ.अर्जुन चव्हाण*

(अध्यक्ष,हिंदी विभाग, शिवाजी विश्वविद्यालय, कोल्हापुर)

*२- वक्ता* : *डॉ.कृष्ण बीर सिंग*

(संपादक, आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकाएँ जयपुर, राज्यस्थान)

*राष्ट्रीय ई- वेबीनार पंजीकरण लिंक* :

निशुल्क है।

https://forms.gle/G3rp6T2gkXUpmgKt8

(पंजीकरण करने तथा फीडबैक फॉर्म भरने वाले प्रतिभागियों को ही ई-मेल व्दारा प्रमाण-पत्र प्रदान किए जायेंगे)

*मिटींग आय.डी* .

979 6932 3139

*मिटींग लिंक* :

https://alamo.zoom.us/j/97969323139

*टेलिग्राम ग्रुप लिंक*

https://t.me/joinchat/IBNSDDv2d5_ayAdN

*संयोजन समिति*

*संपर्क** :

*प्रोफे. डॉ.बदने रामकृष्ण*

(हिंदी विभाग)

९४२३४३७२१५

*डॉ.चव्हाण व्यंकट*

(हिंदी विभाग)

९९२२६९६२४०

*संयोजक* :

*प्रोफे. डॉ.कल्याण गुरुनाथ*


(हिंदी विभागाध्यक्ष)

९५५२२०२८७८

९५१८९९२९९३








Dr. Krishan Bir Singh


Close
Participants (94)
Dr Parvinder Kour Mahajan
Dr Ranjit Jadhav
Dr suma T Rodanwar
Dr TK Geetha
Dr. ANILKUMAR RATHOD
Dr. Gautam Waghmare
Dr. kamble Vilas Nagorao
Dr. Ma. Na. Gaikwad
Dr. Maneesha Sharma
Dr. Ram Dagdu Khalangre
Dr. Santosh Kulkarni
Dr.Bayaja Kotule
Dr.pallavi Bhudev patil
Dr.PRADIP DESAI
DR.SAMBHAJI M. BHOSALE
Dr.shrirang wattamwar
Dr.Wadchkar shivaji
Hatmandge Bheemashank...
Jadhav sampatrao sadashiv
Jalalkhan Pathan
KAKANI SRI KRISHNA
Kankute Subhash.
Invite


Shraddha Singh
Shrikant jewale
shrinivas pawar
Somnath Mane
Sudarshana Sonvane
Sugriv Kshirsagar
Sundar Londhe
Sunita M
Thakurdas M.B.
Umakant Padamwar
Vebinar
Vinod Kumar Bhargava
Vitthal Keshavrao Tekale
Yogita Deshmukh
Yojana Ramkishan Nakade
Yuvraj Rajaram Mulye
आरती ठाकूर Arti Thakur
Invite


12:51
Close
Participants (95)
Shilpa Shendge
Shivajirao Kharujkar
Shobha Dhankikar
Shraddha Singh
Shrikant jewale
shrinivas pawar
Somnath Mane
Sudarshana Sonvane
Sugriv Kshirsagar
Sundar Londhe
Sunita M
Thakurdas M.B.
Umakant Padamwar
Vebinar
Invite

मराठवाडा नेता

# जोपर्यंत मानव जातीचे अस्तित्व तोपर्यंत संत साहित्य प्रेरक

## प्र-कुलगुरू डॉ.जोगेंद्र सिंह बिसेन

मुखेड/प्रतिनिधी



आजच्या यंत्र-तंत्र युगातही संत साहित्य महत्त्वाचे आहे. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे पण त्यानुसार लोकांमध्ये जिव्हाळा दिसत नाही. आज आपण सिमेंटचे जंगल (इमारती) उभ्या करतो आहोत पण त्यात राहणाऱ्यात प्रेम दिसत नाही. भौतिक सुविधा प्रचंड आल्या पण आत्मिक समाधान हरवून चाललो आहोत. आज विद्यालयातून व महाविद्यालयातून मूल्य शिक्षण म्हणजे संस्कारांचे शिक्षण भावी पीढींना देणे महत्त्वाचे आहे.संत साहित्य मानवतेची शिकवण देते. आज सर्व क्षेत्रात विस्फोटक स्थिती पहावयास मिळते आहे. संतांनी चुकीच्या रूढी-परंपरा वर ही प्रहार केला. माणसाला माणसासी जोडण्याचं काम संत साहित्य करत.शिक्षक, प्राध्यापक हे समाज घडविण्याचे काम करतात. त्यांनी त्यांच्या कामात संस्कारानुरुप वर्तन करून आदर्श घालून दिला पाहिजे. जोपर्यंत मानव जातीचे अस्तित्व आहे तोपर्यंत संत साहित्य प्रेरक राहानार आहे असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्र -कुलगुरू डॉ. जोगेंद्र सिंह बिसेन यांनी ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय वसंतनगर ता. मुखेड जि. नांदेडच्या हिंदी विभागद्वारा आयोजित एक दिवसीय ई -राष्ट्रीय परिषदेत' हिंदी संत साहित्य की प्रासंगिकता' या विषयावर उद्घाटकीय वक्तव्य देताना केले.

यावेळी बीज वक्ता म्हणून बोलताना माजी प्राचार्य डॉ. महेंद्र ठाकूरदास म्हणाले की संत हे प्रत्येक काळात सामान्य माणसांना मार्गदर्शन करत राहिले आहेत. ईश्वराला तर आपण पाहिले नाही पण ईश्वराचे प्रतिरूप जर कोण असतील तर ते संत आहेत. संतांनी गुरुचे महत्त्व,नाम महत्त्व सांगितले. ते ही लोकभाषेतून. समाजातील कर्मकांडावर, जातीयतेवर तीव्र प्रहार केला. सर्व संत हे गृहस्थी होते. त्यांनी आपापली कर्तव्य पार पाडत ईश्वर भक्ती केली. आज समाजातील संतांकडील वैभव पाहिले असता असे वाटते की हे संत नसून असंत आहेत. ज्या संतांनी आयुष्यभर जातीयतेला विरोध केला. त्या संतांची आपण वाटणी करून घेत आहोत. आज बाजारवाद सर्वत्र पसरला आहे. या काळात संतांचे विचार आपल्यात मूल्य रुजविण्याचे काम करतात. निसर्गाबद्दल संतांनी पाश्चात्यांपेक्षा वेगळा विचार दिला. संत निसर्गाला सोबत घेवुन मार्गक्रमण करतात. त्यावर ते विजय प्राप्त करण्याची भाषा करत नाहीत.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील हिंदी विभागप्रमुख प्रोफे. डॉ. अर्जुन चव्हाण म्हणाले की संतांनी संयम शिकवला. सध्याचे वातावरण हे चिंताजनक व चिंतनजनक आहे. मूल्य सर्व क्षेत्रात ढासाळताना दिसतात. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था त्या काळात नसती तर कबीर व अन्य संत झाले नसते. या व्यवस्थेने त्या काळी समाजाचे शोषण केले म्हणुन संत जन्माला आले.भक्तीमध्ये चारित्र्याला महत्त्व दिले.भक्तीत प्रेमाला सर्वो परी मानले. मानवता,सभ्यता व संस्कृतीचा मार्ग प्रशस्त करण्याचे काम संतांनी केले.सामाजिक शुद्धतेला विशेष महत्त्व दिले. ज्ञानेश्वरां सारख्या मराठी भाषेतील संताने पसायदान लिहून जगत कल्याणाची कल्पना केली. जयपूर येथील संपादक प्रोफे.डॉ. कृष्ण बीर सिंग म्हणाले की आज आपण आत्मशोध घेतला पाहिजे. प्रत्येक मानवा मध्ये एक अमानव बसलेला आहे. त्याच्या विरुद्ध संतांचा लढा होता.संत साहित्य पुस्तकातून वाचून सांगण्यापेक्षा ते आचरणात आणणे महत्त्वाचे आहे. आपण संतांबद्दल बोलतो पण संतांप्रमाणे वागताना दिसत नाहीत. केवळ संत साहित्याचा भावार्थ सांगून जमणार नाही तर त्यानुसार आपण स्वतः व विद्यार्थ्यांना कार्य करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड यांनी आज कोरोनाच्या महामारीत आपली मानसिकता ही तणावपूर्ण बनत चालली आहे. अशा काळात आपल्याला तणावमुक्त करण्यासाठी संत साहित्याला शरण जावे लागते.त्यासाठी हा विषय निवडला गेला आहे असे सांगितले. वेबिनारचा विषय, वक्ते व एकंदर आयोजनाबद्दल त्यांनी आपल्या वक्तव्यातून समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रस्तुत महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रमुख प्रोफे. डॉ.गुरुनाथ कल्याण यांनी करून वेबिनार आयोजना पाठी मागची भूमिका सविस्तर विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन हिंदी विभागाचे प्रा. डॉ.व्यंकट चव्हाण यांनी केले तर याच विभागाचे प्रोफे.डॉ रामकृष्ण बदने यांनी आभार मानले.

या वेबिनारसाठी तंत्र सहाय्य संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा.संजय पाटील व याच विभागाचे प्रा. गोविंद पांडे यांनी केले. वेबिनार साठी ४०० पेक्षा अधिक जणांनी नोंदणी केली व श्रवणासाठी देशभरातून अनेक प्राचार्य, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जोपर्यंत मानव जातीचे अस्तित्व तोपर्यंत संत साहित्य प्रेर

## ▶ प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांचे वक्तव्य



---

पुण्यनगरी | १० | मंगळवार, २ मार्च २०२१ | नांदेड

# संतांनी मानवता, सभ्यता व संस्कृतीचा मार्ग प्रशस्त केला - प्रोफे. चव्हाण

---

पुढारी

# संतांनी समाजात मानवी मूल्य रुजविण्याचे काम केले

## माजी प्राचार्य डॉ. महेंद्र ठाकूरदास यांचे ई -राष्ट्रीय परिषदेत' मत

मुखेड, पुढारी वृत्तसेवा : संत हे प्रत्येक काळात सामान्य माणसांना मार्गदर्शन करत राहिले आहेत. ईश्वराला तर आपण पाहिले नाही, पण ईश्वराचे प्रतिरूप जर कोण असतील तर ते संत आहेत. संत निसर्गाला सोबत घेऊन मार्गक्रमण करतात. त्यावर ते विजय प्राप्त करण्याची भाषा करत नाहीत. संतांनी समाजात मानवीय मूल्य रुजविण्याचे काम केले, असे प्रतिपादन माजी प्राचार्य डॉ. महेंद्र ठाकूरदास यांनी केले.

तालुक्यातील वसंतनगर येथील ग्रामीण महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने आयोजित एक दिवसीय ई -राष्ट्रीय परिषदेत हिंदी संत साहित्य की प्रासंगिकता या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना स्वाराती़म विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्र सिंह बिसेन म्हणाले की, आजच्या यंत्र-तंत्र युगातही संत साहित्य महत्त्वाचे आहे. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. पण त्यानुसार लोकांमध्ये जिव्हाळा दिसत नाही. आज आपण सिमेंटचे जंगल उभे करत आहोत. पण त्यात राहणाऱ्यांत प्रेम दिसत नाही. भौतिक सुविधा प्रचंड आल्या पण आत्मिक समाधान हरवून चाललो आहोत. आज विद्यालयातून व महाविद्यालयात मूल्य शिक्षण म्हणजे संस्काराचे शिक्षण भावी पिढ्यांना देणे महत्त्वाचे आहे.

संत साहित्य मानवतेची शिकवण देते. आज सर्व क्षेत्रात विस्फोटक स्थिती पहावयास मिळते आहे. संतांनी चुकीच्या रूढी-परंपरा यावरही प्रहार केला. माणसाला माणसाशी जोडण्याचे काम संत साहित्य करते. शिक्षक, प्राध्यापक हे समाज घडविण्याचे काम करतात. त्यांनी त्यांच्या कामात संस्कार अनुरूप वर्तन करून आदर्श घालून दिला पाहिजे. जोपर्यंत मानव जातीचे अस्तित्व आहे तोपर्यंत संत साहित्य प्रेरक राहणार आहे.

प्रास्ताविक हिंदी विभागाचे प्रमुख प्रोफे. डॉ. गुरुनाथ कल्याण यांनी करून वेबिनार आयोजना मागची भूमिका विशद केली. सूत्रसंचलन हिंदी विभागाचे प्रा. डॉ. व्यंकट चव्हाण यांनी केले. आभार प्रोफे. डॉ. रामकृष्ण बदने यांनी मानले.

दरम्यान शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील हिंदी विभागप्रमुख प्रोफे. डॉ. अर्जुन चव्हाण म्हणाले की, संतांनी संयम शिकवला. सध्याचे वातावरण हे चिंताजनक व चिंतनजनक आहे. मूल्य सर्व क्षेत्रात ढासळताना दिसतात. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था त्या काळात नसती तर कबीर व अन्य संत झाले नसते. या व्यवस्थेने त्या काळी समाजाचे शोषण केले म्हणून संत जन्माला आले. भक्तीमध्ये चारित्र्याला महत्त्व दिले. भक्तीत प्रेमाला सर्वोपरी मानले. मानवता, सभ्यता व संस्कृतीचा मार्ग प्रशस्त करण्याचे काम संतांनी केले. सामाजिक शुद्धतेला विशेष महत्त्व दिले. ज्ञानेश्वरा सारख्या मराठी भाषेतील संतांचे पसायदान लिहून जगत कल्याणाची कल्पना दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

My Nanded Edition
Mar 2, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

---

६ प्रजावाणी

# मानवाच्या अस्तित्वापर्यंत संत साहित्य राहणार -डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन

मुखेड (वार्ताहर), दि.१:- जोपर्यंत मानव जातीचे अस्तित्व आहे, तोपर्यंत संत साहित्य प्रेरक राहणार आहे. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडचे प्रभारी कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांनी व्यक्त केले आहे.

ग्रामीण (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय, वसंतनगर ता. मुखेडच्या हिंदी विभागद्वारा आयोजित एक दिवसीय ई -राष्ट्रीय परिषदेत' हिंदी संत साहित्य की प्रासंगिकता' या विषयावर उद्घाटकीय वक्तव्य देताना ते बोलत होते. प्राचार्य डॉ. हरिदास राठोड कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

डॉ. बिसेन यांनी सांगितले की, आजच्या यंत्र-तंत्र युगात संत साहित्य महत्वाचे आहे. एकीकडे लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे पण त्यानुसार लोकांमध्ये जिव्हाळा दिसत नाही. आज आपण सिमेंटचे जंगल (इमारती) उभ्या करतो आहोत पण त्यात राहणाऱ्यात प्रेम दिसत नाही. भौतिक सुविधा प्रचंड आल्या पण आत्मिक समाधान हरवून चाललो आहोत. आज विद्यालयातून व महाविद्यालयातून मूल्य शिक्षण म्हणजे संस्कारांचे शिक्षण भावी पीढींना देणे महत्वाचे आहे. संत साहित्य मानवतेची शिकवण देते. आज सर्व क्षेत्रात विस्फोटक स्थिती पहावयास मिळते आहे. संतांनी चुकीच्या रूढी-परंपरावरही प्रहार केला. माणसाला माणसासी जोडण्याचं काम संत साहित्य करत. शिक्षक, प्राध्यापक हे समाज घडविण्याचे काम करतात. त्यांनी त्यांच्या कामात संस्कारानुरूप वर्तन करून आदर्श घालून दिला पाहिजे, असे ते म्हणाले.

यावेळी बीज वक्ता म्हणून बोलताना माजी प्राचार्य डॉ. महेंद्र ठाकूरदास म्हणाले की, संत हे प्रत्येक काळात सामान्य माणसांना मार्गदर्शन करत राहिले आहेत. ईश्वराला तर आपण पाहिले नाही पण ईश्वराचे प्रतिरूप जर कोण असतील तर ते संत आहेत. संतांनी गुरूचे महत्व, नाम महत्व सांगितले.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बोलताना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील हिंदी विभागप्रमुख डॉ. अर्जुन चव्हाण यांनी संतांनी संयम शिकवला. सध्याचे वातावरण हे चिंतनजनक आहे. मूल्य सर्व क्षेत्रात ढासळताना दिसतात. वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था त्या काळात नसती तर कबीर व अन्य संत झाले नसते. या व्यवस्थेने त्या काळी समाजाचे शोषण केले म्हणून संत जन्माला आले. भक्तीमध्ये चारित्र्याला महत्व दिले. भक्तीत प्रेमाला सर्वोपरी मानले, असे सांगितले.

जयपूर येथील संपादक डॉ. कृष्ण बीरसिंग यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास राठोड यांनी आज कोरोनाच्या महामारीत आपली मानसिकता ही तणावपूर्ण बनत चालली आहे. अशा काळात आपल्याला तणावमुक्त करण्यासाठी संत साहित्याला शरण जावे लागते. त्यासाठी हा विषय निवडला गेला आहे, असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रस्तुत महाविद्यालयाच्या हिंदी विभागाचे प्रमुख डॉ. गुरुनाथ कल्याण यांनी करून वेबिनार आयोजना पाठीमागची भूमिका विषद केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी विभागाचे प्रा. डॉ. व्यंकट चव्हाण यांनी केले तर याच विभागाचे डॉ. रामकृष्ण बदने यांनी आभार मानले.